| | | |
|---|---|---|
| MHGO040007482021 | DISTRICT COURTS MAHARASHTRA<br>सत्यमेव जयते | दाखल दिनांक: १०.०८.२०२१.<br>नोंदणी दिनांक: १०.०८.२०२१..<br>निकाल तारीख: ०२.०१.२०२५.<br>कलावधी: व. ०३, म.०४, दि.२३ |

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगाव यांचे न्यायालयात, आमगाव.

**(पिठासीन अधिकारी श्री ए. आर. जोशी)**

<u>नि. फौ. ख. क्र. ७४/२०२१.</u> <u>नि. क्र. ३०</u>.

**महाराष्ट्र सरकार तर्फे**

आमगांव पोलीस स्टेशन. ....... अभियोगपक्ष.

**विरूद्ध**

१. **मयुर संतोष गडकरी,**
वयः २१ वर्षे, धंदा– मजुरी,

२. **शुभम राजकुमार मेश्राम,**
वयः १९ वर्षे, धंदा– मजुरी,

३. **कुणाल राजेश साखरे,**
वयः २२ वर्षे, धंदा– मजुरी,

४. **रिंकु प्रकाश गेडाम,**
वयः १९ वर्षे, धंदा– मजुरी,

५. **सहयोग पुरुषोत्तम घोडेश्वर,**
वयः २० वर्षे, धंदा– मजुरी,

६. **लवकुश प्रमोद भाष्कर,**
वयः १९ वर्षे, धंदा– मजुरी,
सर्व रा. पाऊलदौना रोड, कुंभारटोली
ता. आमगांव जि. गोंदिया. ....... आरोपी.

**<u>खटला भा.दं.वि.कलम ४५४, ४५७ व ३८० सहकलम ३४ प्रमाणे.</u>**

अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता – श्रीमती पी. के. रंगारी

आरोपी क्र.१, ३, ५ व ६ तर्फे विधिज्ञ – श्री जी. सी. साखरे.

आरोपी क्र.४ तर्फे विधिज्ञ – श्री. एस. डी. बागडे.

## न्या य नि र्ण य

## (दिनांक ०२ जानेवारी, २०२५ रोजी घोषित)

०१. प्रस्तुत खटला हा भारतीय दंड विधान संहिता कलम **४५४**, **४५७** व **३८०** सहकलम **३४** अन्वये आरोपींविरुध्द दाखल करण्यात आला आहे.

अभियोगपक्षाचे वतीने मांडण्यात आलेली वस्तुस्थिती खालील प्रमाणे.

०२. फिर्यादी मनुबाई बे. भाऊदास भाष्कर असून यांनी असी फिर्याद दिली की, दिनांक ०५.०४.२०२१ रोजी सकाळी ०७:०० वाजताचे दरम्यान ती त्यांची लहान मुलगी भिमा महेन्द्र कोटागले रा. कळमेश्वर, नागपूर येथे गेले होती. दिनांक १०.०५.२०२१ रोजी त्यांना त्यांचे शेजारी राहणारी सौ. मंजु नरेन्द्र भालाधरे यांचा मोबाईलवर फोन आला व त्यांनी सांगितले की, तुमच्या घराचे दरवाजे खुले आहेत. तेव्हा त्यांना गावी येण्यास साधन नसल्याने व लाकडाऊन असल्यामुळे ती दिनांक १८.०५.२०२१ रोजी सायंकाळी ०६:०० वाजताचे दरम्यान घरी आली. तेव्हा त्यांना घराचा समोरचा दरवाजाच्या कुलुप तुटलेला दिसला. नंतर त्यांनी आत जावून सामानाची पाहणी केली असता घरातील सामान विखुरलेला होता. किचन रुममध्ये ठेवलेला इंडेन कंपनीचा गॅसचा हन्डा किंमत ३००/– रुपये चा माल दिसला नाही. तसेच किचन रुममध्ये असलेल्या तांब्याचा गडु किंमती १५०/– रुपये, कास्याची वाठी १ नग किंमती २००/– रुपयेचा माल दिसला नाही. त्यानंतर त्याने आमगांव पोलीस ठाण्यात जावून अज्ञात चोर विरुद्ध चोरीची तोंडी रिपोर्ट दाखल केली.

०३. फिर्यादीवरुन आमगांव पोलीस ठाण्यात गु.र.क्र. १४७/२०२१ नोंदविण्यात आला व गुन्ह्याचा तपास सहाय्यक फौजदार दिलीप कन्नमवार यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान, त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा, मुद्देमाल जप्ती पंचनामा, साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविली व आरोपींस अटक करुन न्यायालयात हजर केले व

तपासात आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्यांच्याविरुध्द तपासाअंती दोषारोपत्र दाखल केले.

०४. आरोपपत्रावरुन दखल घेऊन, माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपींविरूध्द भा. दं. वि. कलम **४५४, ४५७** व **३८०** सहकलम **३४** अन्वये दोषारोप **नि. क्र. ०३** अन्वये निश्चित केले. आरोपींनी नि. क्र. **०४** ते **०९** वरील निवेदनाद्वारे दोषारोप मान्य नसल्याचे कळविले आहे व संपरीक्षेची मागणी केली.

०५. मी अभियोगपक्षाचे व आरोपींच्या वतीने त्यांचे विद्वान वकीलांचे म्हणणे ऐकले व न्यायपटावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता, माझेपुढे काही मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे मी माझे निष्कर्षासह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक ०५.०४.२०२१ रोजी ०७:०० वाजेपासून ते दिनांक १०.०५.२०२१ रोजी ११:०० वाजेपर्यंत मौजा कुंभारटोली आमगांव ता. आमगांव, जि. गोंदिया येथे आरोपींनी आपापसात संगनमत करुन, फिर्यादीच्या घरामध्ये अपराध कराव्याकरिता छपून बसून घराविषयी आगळीक केली किंवा घर फोडण्याचा अपराध केला ? | नकारार्थी. |
| **२.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपापसात संगनमत करुन, छपून बसून रात्रीस फिर्यादीच्या घराच्या दरवाज्याचा कुलूप तोडून चोरी करण्याच्या उद्देशाने घरफोडी करुन अतिक्रमण केले? | नकारार्थी. |
| **३.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपापसात संगनमत करुन, फिर्यादीच्या | नकारार्थी. |

घराच्या दरवाज्याचा कुलूप तोडून, १. इंडेन कंपनीच्या हन्डा, २. तांब्याचा गड्ु, ३. कास्याची वाटी असा एकूण ३३५०/– रुपयेचा माल त्याच्या संमतीशिवाय चोरी केली ?

**४.** अंतिम आदेश काय ? अंतिम आदेशाप्रमाणे.

<u>**कारणमिमांसा**</u>

०६. अभियोगपक्षाने खटल्याच्या पृष्ट्यर्थ केवळ एक साक्षीदार तपासले आहेत. फिर्यादी मनुबाई भाउदास भाष्कर (स. सा. क्र. १) यांनी **नि. क्र. ११** वर साक्ष नोंदविली. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी **नि. क्र. १७** वर पुर्शिस दाखल करुन, त्यांचा पुरावा बंद केला.

०७. अभियोगपक्षाचा पुरावा बंद केल्यानंतर आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये **नि. क्र. १८** ते **२२ (अ)** वर निवेदन नोंदविण्यात आले. आरोपींनी त्यांच्या फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वयेच्या निवेदनातील प्रश्नांना दिलेल्या उत्तरावरून, तसेच आरोपींच्या विद्वान वकीलांनी, अभियोगपक्षाच्या साक्षीदारास विचारलेल्या प्रश्नांवरून त्याच्यांविरुध्द खोटा खटला दाखल करण्यात आल्याचा त्याचा बचाव असल्याचे दिसुन येते.

<u>**मुद्दे क्र. १ ते ३ करिताः**</u>**–**

०८. अभियोगपक्षातर्फे मनुबाई भाऊदास भाष्कर सा. क्र. १ हे फिर्यादी असून, त्यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यात कथन केले की, घटना पाचव्या महिन्यात २०२१ मध्ये घडली होती. ते सदरच्या दिवशी त्याची मुलीकळे कळमेश्वर येथे गेली होती. त्यांचा घरुन गॅस हंडा, २ नाकातल्या फुल्या, कास्याची वाटी, तांब्याचे गडू हे चोरी गेले होते. त्यानंतर त्यानी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती. त्याला **नि. क्र. १२** देण्यात आला आहे. त्यावर त्यांची सही आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला

**नि. क्र. १३** देण्यात आला. पोलीसांनी त्यांचे बयान नोंदविले. तो न्यायालयात हजर आरोपींना ओळखत नाही.

०९. सदर साक्षीदाराचा आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आला. त्यात त्यांनी मान्य केले की, दिनांक १९.०५.२०२१ रोजी त्यांनी पोलीस स्टेशनला जावून रिपोर्ट दिली होती. हंडा कोणत्या कंपनीच्या होता, हे त्यांना माहित नाही. सदर साक्षीदाराला आरोपींतर्फे विचारण्यात आलेल्या इतर प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

१०. एकंदरीत अभियोगपक्षाचा पुराव्याचा विचार करता असे दिसुन येते की, (स. सा. क्र. १) हे फिर्यादी असून, त्यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, त्याचे घरी कुणी चोरी केली, याबाबत त्यांना माहिती नाही व तो आरोपीला ओळखत नाही. अभियोगपक्षातर्फे एकही पंच साक्षदाराचे जबाब नोंदविण्यात आलेले नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा निसंश्यरित्या सिद्ध झालेला नाही. सर्वात महत्वाची बाब म्हणजे, प्रस्तुत प्रकरणात दाखल अधिकारी व तपासी अधिकारी यांचे जबाब नोंदविण्यात आलेले नाही. तसेच सदरची चोरी आरोपींनीच केली होती, याबाबत कोणताही खुलासा अभियोगपक्षाच्या पुराव्यात दिसून येत नाही. त्यामुळे आरोपींना संशयाचा फायदा देवून निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होईल. असे माझे स्पष्ट मत आहे. म्हणुन मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ करिता:**

११. मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी दिल्यामुळे, मी मुद्दा क्र. ४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ **मयुर संतोष गडकरी,** आरोपी क्र. २ **शुभम राजकुमार मेश्राम,** आरोपी क्र. ३ **कुणाल राजेश साखरे,** आरोपी क्र. ४ **रिंकु प्रकाश गेडाम,** आरोपी क्र. ५ **सहयोग पुरुषोत्तम घोडेश्वर** व आरोपी क्र. ६

**लवकुश प्रमोद भाष्कर,** यांना भारतीय दंड विधान संहिता कलम **४५४, ४५७** व **३८०** सहकलम **३४** अन्वये गुन्ह्याच्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम **२४८ (१)** प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७–अ अन्वयेची पुर्तता केली आहे.

३. जप्त मुद्देमाल म्हणजे, इंन्डेन कंपनीच्या हंडा, तांब्याच्या गडु १ नग व कास्याची वाटी १ नग अपील कालावधीनंतर मुळ मालकास ओळख पटवून परत करण्यात यावी.

४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

दिनांक:– ०२.०१.२०२५.
ठिकाण:– आमगाव.

स्वा/–
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगाव.